सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात बिगर आदिवासी क्षेत्रातील निकषपात्र ८४० माध्यमिक शाळांना अनुदान मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय,क्रमांक: माशाअ १८०६/(४४२/०६)माशि-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक: १५ सप्टेंबर, २००६.

वाचा:- १) शासन निर्णय,शालेय शिक्षण विभाग क्रमांक:नमाशा १०९९/(१०७६/९९),माशि-१, दिनांक ११ ऑक्टोबर,२०००.
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : माशाअ १ ०३/(५१६/०३)/माशि १, दिनांक १७ फेब्रुवारी, २००४.
३) शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्रमांक: माशाअ १८०४/(६५६/०४)/माशि १, दिनांक २७ ऑक्टोबर, २००५.
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक: पूरक २९०६/(५६/०६)/अर्थसंकल्प, दिनांक १३ सप्टेंबर, २००६.

शासन निर्णय :-

संदर्भाधीन दिनांक १७ फेब्रुवारी २००४ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या निकषानुसार ज्या शाळांचे मूल्यांकन करण्यात येऊन मूल्यांकनानुसार अनुदानासाठी पात्र ठरलेल्या माध्यमिक शाळांची यादी संदर्भित दिनांक २७ ऑक्टोबर, २००५ अन्वये घोषित करण्यात आली आहे. या शाळांपैकी बिगर आदिवासी क्षेत्रातील ८४० शाळांना अनुदान मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार दिनांक २७ ऑक्टोबर, २००५ च्या शासन निर्णया सोबतच्या विवरणपत्रातील ८४० शाळांना सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात सहा महिन्यांसाठी म्हणजे सप्टेंबर २००६ ते फेब्रुवारी २००७ या कालावधीसाठी २० टक्केप्रमाणे रु. २१.४२ कोटी (रुपये एकवीस कोटी बेचाळीस लक्ष फक्त) इतके अनुदान वितरीत करण्यास शासन परवानगी देण्यात येत आहे.

२. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी [illegible] जिल्हानिहाय तात्काळ वाटप करून सदरच्या शाळांना अनुदान देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावी. सदर निधी मासिक निधी विवरणपत्रानुसार खर्च करण्यात यावा.

३. या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेले अनुदान त्वरित वितरीत होईल याबाबत शिक्षण संचालकांनी दक्षता घ्यावी.

४. उपरोक्त प्रयोजनासाठी होणारा खर्च खालील दर्शविण्यात लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा:
"२२०२ सर्वसाधारण शिक्षण ०२- माध्यमिक शिक्षण ११०- अशासकीय माध्यमिक शाळांना व कनिष्ठ महाविद्यालयांना सहाय्य - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (००) (११) सर्वसाधारण माध्यमिक शाळांच्या विकासासाठी सहायक अनुदान (२२०२३३६१)"

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्रमांक खर्चनि १००६/प्र.क्र.१/अर्थोपाय, दिनांक २०/४/२००६ अन्वये मिळालेल्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००६०९१६१७०३९३२००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अ.ना.भट्टलवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्चमाध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
संबंधित शिक्षणाधिकारी,(माध्यमिक) व शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई.
संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
महालेखापाल, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर.
महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर.
नियोजन विभाग.
वित्त विभाग (कार्यासन व्यय ५)
लेखा अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती (माशि-१)